## ज्योतिषविषयक

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक
प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा,
नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश,
कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू
व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी
**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर**
**जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड,**
**नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

DIRECT ADMISSION
MBBS | MD | MS | BDS | MDS
BAMS | BUMS | BHMS
PANCHAKARMA
DERMATOLOGY | NURSING
PHARMACY
PHYSIOTHERAPY
PARAMEDICAL | VETERINARY
OPHTHALMOLOGY | FMGE
Indo Abroad Education
93261 34770

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १७८ वा | सोमवार, दि. १६ फेब्रुवारी २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# टिपू सुलतान आणि शिवरायांच्या वक्तव्याने हर्षवर्धन सपकाळांवर टीका

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्याप्रमाणे शौर्य आणि स्वराज्य असा विचार दिला, अगदी त्याचप्रमाणे टिपू सुलतान यांनी काम केले आहे. त्यामुळे टिपू सुलतान यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या समकक्ष मानले गेले पाहिजे, असे वादग्रस्त विधान काँग्रेस प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी बुलढाणा येथे केले.

मालेगाव महानगरपालिकेचे नवनियुक्त उपमहापौर शान-ए-हिंद निहाल अहमद यांनी आपल्या दालनात टिपू सुलतानचा पट्टो लावल्याने वाद निर्माण झाला होता. वाद चिघळल्यावर त्यांनी तो पट्टो दालनातून काढून टाकला. यामुळे वाद शमेल अशी अपेक्षा असतानाच हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानची तुलना शिवाजी महाराजांशी केल्याने नवा वाद निर्माण झाला आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, छत्रपती शिवाजी महाराजांशी टिपू सुलतान याची तुलना करताना हर्षवर्धन सपकाळ यांना लाज वाटली पाहिजे, तसेच त्यांनी माफी मागावी, अशी मागणी केली आहे. दरम्यान, सकपाळ यांच्या वक्तव्यावरून शिवप्रेमींमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत असून सपकाळांनी आपले विधान मागे घ्यावे अन्यथा आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

**सपकाळ नेमके काय म्हणाले ?**

छत्रपती शिवाजी महाराज यांचं शौर्य ज्या प्रकारचं आहे, त्यांनी जो स्वराज्याचा विचार दिला, त्याच मांदियाळीत, त्यांच्यानंतर बऱ्याच वर्षांनी टिपू सुलतान यांनी इंग्रजांच्या विरोधात लढा पुकारला होता. त्या अर्थाने टिपू सुलतान हे शौर्य गाजवणारे एक योद्धे होते. ते भारताचे भूमिपुत्र होते, त्यांनी कधीही कोणत्याही विषारी, विखारी विचारांना जवळ केले नाही. त्यामुळे शौयार्चे लक्षण म्हणून आपण टिपू सुलतान यांच्याकडे शिवाजी महाराजांच्या समकक्ष पाहिले पाहिजे, असे वक्तव्य काँग्रेस प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले.

**हे अतिशय निंदनीय -फडणवीस**

टिपू सुलतानसारख्या नराधमाची तुलना छत्रपती शिवाजी महाराजांशी करण्याचे काम हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे. हे अतिशय निंदनीय आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. शिवाजी महाराजांनी स्वराज्य उभारून मोगलांच्या जोखडातून सामान्यांना मुक्त करण्याचं काम केलं. खऱ्या अर्थाने त्यांनी सामान्य रयतेचे राज्य निमाण केले. त्याचवेळी हजारो-लाखो हिंदूंची हत्या करणाऱ्या टिपू सुलतानशी महाराजांची तुलना करून दोघांनाही सारखाच सन्मान द्या म्हणणे यापेक्षा जास्त लांगूलचालन या जन्मात मी बघितले नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया फडणवीस यांनी दिली.



# एपस्टिन फाईल्समुळे भाजपला राज्यात दंगली घडवायच्या आहेत

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** मालेगाव महापालिकेच्या उपमहापौरांनी आपल्या दालनात टिपू सुलतान यांचा फोटो लावण्यानं मोठा वाद निर्माण झाला आहे. या वादावर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या दोघांमध्ये वादाची ठिणगी उडाली आहे.

## हर्षवर्धन सपकाळ यांचे फडणवीसांना उत्तर

दोघे एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करत आहेत फडणवीस यांनी सपकाळ यांना सडेतोड उत्तर दिल्यावर आज सपकाळ यांनी भाजप च्या अनेक नेत्यांची नावे एपस्टिन फाईल्समध्ये आल्यामुळे ते घाबरले आहेत. यामुळे लोकांना मूळ विषयावरून भरकटवण्यासाठी आणि राज्यात दंगली घडवण्यासाठी ते अशा प्रकारचे आरोप करत सुटल्याची टीका सपकाळ यांनी केली.

छत्रपती शिवाजी महाराज हे आपले दैवत आहेत, आन, बान, शान आहेत, त्यांचा पराक्रम अद्वितीय आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याच्या प्रेरणेतून संविधानाची निर्मिती झाली आहे. भाजपकडून आम्हाला छत्रपती शिवाजी महाराज शिकण्याची गरज नाही. एपस्टिन फाईल्समध्ये भाजपाच्या नेत्यांची नावे आली आहेत, अमेरिकेबरोबरचा व्यापार कराराचा मुद्दा आहे आणि राज्यातही ज्वलंत मुद्दे आहेत, या मुळ मुद्यांना बगल देण्यासाठी भाजपाकडून माज्या वक्तव्याची मोडतोड करून 'ध' चा 'मा' करून राज्यात दंगली घडवायच्या आहेत, याचा प्रत्यय आज पुण्यात आला, असा गंभीर आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजपावर केला आहे.

सपकाळ यांनी पुढे सांगितले की, मला माफी मागायला लावण्याची भाषा माफीवीरांचा पक्ष करत आहे. परंतु टिपू सुलतानच्या मुद्द्यावर बोलताना भाजपा व देवेंद्र फडणवीस हे विसरत आहेत की, नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकीत भाजपाच्या बॅनर्स व पोस्टर्सवर टिपू सुलतानचे फोटो होते. भाजपाने राज्यात अमरावती चंद्रपूरसह २१ ठिकाणी धर्मांध एमआयएमशी युती केली आहे, हे भाजपाला चालते, मग आताच काय झालं.

भाजपा काँग्रेस कार्यालयावर मोर्चा आणणार आणि १७ तारखेला माझे पुतळे जाळणार आहे, अशी माहिती मिळत आहे. मग सावरकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या हिंदवी स्वराज्याला 'काततीय योग' (कावळा बसायला आणि फांदी तुटायलाङ्क.) असे म्हटले आहे. सावरकरांनी महाराजांबद्दल जे विकृत लिखाण केले आहे तसेच भगतसिंह कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल जी वक्तव्ये केली, त्याबद्दल भाजपा सावरकर आणि कोश्यारी यांचे पुतळे जाळणार का? असा माझा प्रश्न आहे असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

# श्री नीलकंठेश्वर सोशल फाउंडेशनतर्फे सहस्र दीपोत्सव कार्यक्रम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त साखर पेठ येथील नवसाला पावणारे व जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री नीलकंठेश्वर मल्लिकार्जून मंदिर येथे श्री नीलकंठेश्वर सोशल फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सहस्र दीपोत्सव कार्यक्रमाचे मोठ्या भक्तिभावात उद्घाटन झाले.



या दीपोत्सव कार्यक्रमाचे उद्घाटन श्रीमद् वीरशैव कुरुहिनशेट्टी ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष बालाजी मुटकिरी व श्री नीलकंठेश्वर सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष नरसिंग बुगप्पा म्हंता यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी मंदिर परिसर दीपांच्या उजेडाने उजळून निघाला असून भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भगवान शंकराच्या दर्शनाचा लाभ घेतला.

कार्यक्रमास ज्ञाती संस्थेचे उपाध्यक्ष बालाजी येजा, सचिव सत्यनारायण द्यावरकोंडा, खजिनदार श्रीनिवास बंदगी, दिनानाथ धुळम, प्रसाद बिच्चल तसेच सोशल फाउंडेशनचे सल्लागार शंकर बटगिरी, प्रेसिडेंट सुनील धुळम, लखन मिठ्ठा, लखन रुमांडला, महेश धुळम, श्रीनिवास कामुर्ती, अजय गवनी उपस्थित होते.

युवा प्रतिष्ठानचे मार्गदर्शक नितेश पोगुल, अध्यक्ष स्वप्निल आडकी तसेच पद्मशाली सखी संघमच्या ममता मुदगुंडी, माधवी अंदे, मेघा इट्टम, अरुणा गंजी, बालमणी करस्सा यांचीही उपस्थिती लक्षणीय ठरली.

या सहस्र दीपोत्सवाच्या निमित्ताने मंदिरात विशेष पूजा-अर्चा, अभिषेक व महाआरतीचे आयोजन करण्यात आले. भाविकांनी 'हर हर महादेव'च्या जयघोषात दीप प्रज्वलन करून वातावरण भक्तिमय केले.

श्री नीलकंठेश्वर सोशल फाउंडेशनच्या वतीने दरवर्षी महाशिवरात्री निमित्त विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम राबविले जात असून यंदाचा सहस्र दीपोत्सव कार्यक्रम श्रद्धा, एकोप्याची भावना आणि सामाजिक सलोखा जपणारा ठरल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजकांनी भाविकांचे व सर्व कार्यकर्त्यांचे आभार मानले.

# सोलापूर जिल्ह्यातील 13 गावांत सरपंचपदासाठी पोटनिवडणूक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापुर जिल्ह्यातील विविध कारणांमुळे रिक्त झालेल्या १३ सरपंचांच्या आणि २७ ग्रामपंचायत सदस्यांच्या जागांसाठी पोटनिवडणुकीची प्रक्रिया सुरु झाली आहे. राज्य निवडणूक आयोगाने या पोटनिवडणुकीसाठी प्रभागनिहाय मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर केला असून, फेब्रुवारी अखेरीस प्रत्यक्ष मतदानाचा कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे.

राजीनामा, अपात्रता, मृत्यू किंवा मागील निवडणुकीत नामनिर्देशन पत्र न मिळाल्यामुळे या जागा रिक्त झाल्या होत्या. आता या जागा भरण्यासाठी १ जुलै २०२५ च्या अर्हता तारखेनुसार तयार करण्यात आलेल्या मतदार याद्यांच्या आधारे ही निवडणूक घेतली जाणार आहे. त्यानुसार मतदार यादीचा महत्त्वाचा कार्यक्रम १६ फेब्रुवारीला जाहीर होणार आहे. त्यानुसार प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जातील.



त्यानंतर १६ ते २० फेब्रुवारी दरम्यान मतदार यादीवर हरकती व सूचना स्वीकारल्या जातील, तर २४ फेब्रुवारीला अंतिम प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिद्ध होईल. सरपंचांशिवाय सदस्य पदांच्या पोटनिवडणुकीसाठी एकूण २७ जागांसाठीही चिणके, चिकमहूद, खवासपूर, वडशिंगे, भोसरे, पानीव, कोळेगाव, हसापूर, हजगी, सुलतानपूर, कोन्हाळी, चुंब, देवगाव, उंबरगे, ईश्वर वठार, तोगराळी-गुर्देहळ्ळी, मनगोळी, मंद्रूप, कुसूर खानापूर, शंकरनगर, शंकरगाव, तरटगाव, जिंती, भिलारवाडी, डिकसळ याठिकाणी निवडणूक होणार आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्यानंतर आता ग्रामीण भागाचे लक्ष या पोटनिवडणुकीकडे लागले आहे.

**सरपंचपदासाठी 'या' गावांत होणार निवडणूक**

- सांगोलाः अनकढाळ
- माळशिरसः कोळेगाव, लोटे-मोहितेवाडी
- अक्कलकोटः रुद्देवाडी, सलगर, कोन्हाळी
- बार्शीः मांडेगाव
- दक्षिण सोलापूरः वांगी, दर्शनाळी
- करमाळाः कात्रज, रिटेवाडी
- मोहोळः यावली
- मंगळवेढाः फटेवाडी (येथे सरपंचासह ७ सदस्यांनी राजीनामा दिल्याने संपूर्ण गावाची निवडणूक होणार आहे.)

# भरधाव कारची ऊस ट्रॉलीला भीषण धडक; पाच जण जखमी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भरधाव जाणाऱ्या कारने उसाच्या ट्रॅक्टर ट्रॉलीला पाठीमागून धडक देऊन झालेल्या अपघातात पाच जण जखमी झाले, त्यापैकी दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. सर्व जखमींना सोलापूर येथील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. हा अपघात शनिवार ता 14 रोजी पहाटे सव्वा पाच वाजता मोहोळ पोलीस ठाण्याजवळील ब्रिजवर झाला.

ज्ञानेश्वर सिद्धेश्वर वाकडे वय 48, चेतन बसवराज लामतुरे वय 22, सत्यवान निळकंतराव जाधव वय 47, तेजस सत्यवान जाधव वय 18, शुभांगी सत्यवान जाधव वय 37 सर्व राहणार पोकळ गाव ता निलंगा जिल्हा लातूर अशी जखमींची नावे आहेत. यातील ज्ञानेश्वर वाकडे व तेजस जाधव या दोघांची प्रकृती चिंताजनक आहे.

मोहोळ पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, वरील सर्व जखमी कार क्रमांक एम एच 24 सीडी 771 मधून सोलापूरच्या दिशेने निघाले होते. त्या वेळी मोहोळ शहरा जवळील पोलीस ठाण्या समोरील ब्रिजवर उभा असलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीला कारने पाठीमागून जोराची धडक दिली. त्यात वरील पाच जण जखमी झाले. या अपघाताची नोंद मोहोळ पोलिसात झाली असून, अधिक तपास अंमलदार अतुल क्षीरसागर करीत आहेत.

# शहराला दोन दिवसाआड पाणीपुरवठ्याच्या नियोजनाचे महापौर कोंड्याल यांचे आदेश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहराला दोन दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात यावा त्याचबरोबर रात्री- अपरात्री पाणीपुरवठा केला जाऊ नये या संदर्भात तातडीने नियोजन करावे असे आदेश महापौर विनायक कोंड्याल यांनी महापालिका आयुक्तांसह संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत.

लवकरच पाणीपुरवठा विभागाच्या अधिकारी तसेच याबाबत अनुभवी तज्ञ असलेल्या निवृत्त अधिकाऱ्यांची तातडीची बैठक महापौर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

सोलापूर शहराला सध्या तीन ते पाच दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. शहराच्या हद्दवाढ भागात पाच दिवसाआड तर काही ठिकाणी अधिक दिवसाने पाणीपुरवठा होतो. तसेच हद्दवाढ भागात व शहरातील काही भागातही रात्री - अपरात्री पाणीपुरवठा केला जात असल्याने महिलांसह नागरिकांची प्रचंड गैरसोय होते. त्याचा परिणाम नोकरी, रोजगार आणि इतर गोष्टींवर होतो. यामुळे नागरिकांमधून प्रचंड संताप व्यक्त होत आहे. पाणीपुरवठा सुरळीत व्हावा तसेच किमान दोन दिवसाआड तरी पाणीपुरवठा शहराला केला जावा. या अनुषंगाने महापौर विनायक कोंड्याल यांनी निश्चय केला आहे.



या संदर्भात त्यांनी पाणीपुरवठा विभागातील निवृत्त अधिकाऱ्यांशीही चर्चा केली आहे. दोन दिवसाआड पाणीपुरवठा करण्यासाठी तातडीने नियोजन करावे याकरिता महापौर कोंड्याल यांनी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे आणि महापालिका सार्वजनिक आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे यांनाही आदेश दिले आहेत. रात्री अपरात्री करण्यात येणारा पाणीपुरवठाही बंद करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या आहेत. दरम्यान, या संदर्भात प्रशासकीय स्तरावर हालचालींना वेग आला आहे. लवकरच महापौर कक्षात या संदर्भात अधिकाऱ्यांची बैठक महापौर विनायक कोंड्याल यांनी बोलावली आहे. लवकरच शहरातील पाणीपुरवठ्याचे नवे वेळापत्रक तयार करण्यात येणार असल्याचे दिसून येते.

**सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचीही मदत घेणार : महापौर कोंड्याल**

सोलापूर शहराला दोन दिवसाआड पाणीपुरवठा झाला पाहिजे. पाणीपुरवठा सुरळीत आणि आवश्यक त्या दाबाने केला जावा. नागरिकांची गैरसोय टाळावी. यासाठी महापालिका पाणीपुरवठा अधिकारी तसेच यासंबंधीत निवृत्त अनुभवी व तज्ञ अधिकाऱ्यांशी चर्चा केली आहे. यापूर्वी शहराला दोन दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात आला होता. त्याचप्रमाणे सध्याही शहराला दोन दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करावे या संदर्भात महापालिका आयुक्तांना आदेश दिले आहेत. तातडीने बैठकी बोलावली आहे, अशी माहिती महापौर विनायक कोंड्याल यांनी दिली

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार: SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार: SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
Exclusive showroom of Second Hand Car Sales & Service
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

# उजनी धरणाची पाणी पातळी १९ टक्के झाली कमी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** उजनी धरणातून भीमा नदीत सोडण्यात आलेले पाणी बंद करण्यात आले आहे. सध्या उजनीतून शेतीसाठी उजनी मुख्य कालवा, भीमा सीना जोड कालवा, दहिगाव व सीना माढा उपसा सिंचन योजनेतून पाणी सोडण्यात येत आहे.

सध्या उजनी धरणाची पाणी पातळी ८१ टक्के असून २६ जानेवारीपासून १९ टक्के पाणी पातळी कमी झाली आहे.

धरणातून रब्बी हंगामासाठी सुरुवातीला उजनी मुख्य कालवा, जोड कालवा व दहिगाव योजनेतून पाणी सोडण्यात आले होते. त्यानंतर सीना माढा उपसा सिंचन योजना व ५ फेब्रुवारीपासून भीमा नदीत नदीकाठचा शेती व पाणी पुरवठा योजनासाठी सोडण्यात आले होते. ते १२ रोजी बंद करण्यात आले आहे.



गतवर्षी २९ डिसेंबर रोजी शंभर टक्के होते. गतवर्षीचा तुलनेत एक महिना उशिरा शंभर टक्के पाणी पातळी राहिली आहे. सध्या धरणात १०७.१८ टीएमसी पाणीसाठा असून ४३.५२ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा आहे. आत्तापर्यंत १० टीएमसी पाण्याचा वापर झाला आहे.

कालव्यातून २ हजार ३०० क्युसेक, जोड कालव्यातून ६०० क्युसेक सीना माढा उपसा सिंचन योजनेतून २८० क्युसेक विसर्ग सोडण्यात येत आहे. उजनी साधारण एप्रिल शेवटी मे महिन्याचा सुरुवातीला मृत साठ्यात जात असते.

**दोन महिन्याचा प्रश्न सुटला**

सध्या रब्बी हंगामासाठी पाणी सोडण्यात येत आहे. पुढील दोन पाळ्या उन्हाळी हंगामासाठी सोडण्यात येतात. सध्या उजनी धरणातून भीमा नदीत नदीकाठचा गावांना पिण्यासाठी व शेतीसाठी सोडण्यात आल्याने पुढील दोन महिने पाण्याचा प्रश्न मिटला आहे.

**५ ते ६ टीएमसीची बचत**

सोलापूर शहराला पिण्यासाठी समांतर जल वाहिनी सुरू झाल्यामुळे ५ ते ६ टीएमसी पाण्याची बचत होणार आहे. यामुळे जूनअखेरपर्यंत शेतीला पाणी मिळण्याची आशा शेतकऱ्यांना लागली आहे. प्रशासन उजनीच्या पाण्याचे नियोजन कसे करते यावर अवलंबून राहणार आहे.

# विलीनीकरण व्हावे अशी अजितदादांची इच्छा होती, माझीही आहे - जयंत पाटील

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादीच्या विलीनीकरणासाठी अजित पवार यांच्याशी मोजून ११ वेळा चर्चा, बैठका झाल्या होत्या. त्यांच्या पुढाकारानेच ही चर्चा झाली होती. पण, आता तेच राहिले नाहीत, त्यामुळे त्यावर मला काही बोलावे वाटत नाही, मी आज पुण्यात शरद पवार साहेबांच्या प्रकृतीची चौकशी करायला आलो होतो.

त्यांच्याशी राजकारणावर काही बोलणे झाले नाही, असे स्पष्टीकरण राष्ट्रवादी (शरद पवार)चे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी शनिवारी (दि. १४) पुण्यात माध्यमांशी बोलताना दिले. विलीनीकरण व्हावे, अशी माझी इच्छा आहे आणि अजितदादादेखील सकारात्मक होते, एकत्र आलो तर आमचा पक्ष आणखी जोमाने पुढे जाईल, असेही त्यांनी सांगितले.



ज्येष्ठ नेते शरद पवार यांची प्रकृती ठीक नसल्यामुळे रुग्णालयात दाखल केले होते. त्यांना शनिवारी डिस्चार्ज देण्यात आला. त्यांच्या भेटीला रात्री उशिरा जयंत पाटील पुण्यात आले होते. तेव्हा भेटीनंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यांना विलीनीकरणाबाबत विचारले असता, त्यांनी आता यावर बोलणे योग्य नाही, असे सांगितले.

विलीनीकरणाबाबत राज्याचे प्रमुख नेते शशिकांत शिंदे आणि सुप्रिया सुळे हे निर्णय घेतील, ते जो निर्णय घेतील, तो आम्हाला मान्य असणार आहे. त्यानुसार आमची पुढची पावले पडतील. पक्षाचे कामकाज सुरूच आहे. त्याचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. मी यापूर्वी यावर तपशिलात चर्चा केलेली आहे. पण, ती चर्चा आता सांगणे बरे नाही, असेही ते म्हणाले.

"अजितदादा आज नाहीत. त्यामुळे राजकारणात पुढे काही होईल, ते सांगता येत नाही. पण, महाराष्ट्रात अनेक प्रश्न आहेत, त्यावर आम्ही काम करू. त्यादृष्टीने आमचा पक्ष काम करेल. पक्ष विलीनीकरणावर आज भाष्य करावे वाटत नाही." सुनेत्रावहिनींनादेखील मी भेटलो. त्यामुळे त्यांना आम्ही बोललो की, त्यांना काही अडचणी आल्या तर त्या आम्ही सोडवू. त्यांना कुठे अडले तर मदत करू, असे जयंत पाटील यांनी सांगितले.

# नातेपुते पोलीस ठाण्याचे सपोनी महारुद्र परजणे यांचा निरोप समारंभ



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):–** कुठल्याही सरकारी अधिकाऱ्याची बदली हा त्याच्या जीवनाचा अविभाज्य भागच आहे. तो सरकारी अधिकारी आहे म्हणजे त्याची बदली ही होणारच. परंतू ज्या भागात तो काम करतो त्या भागासाठी केलेल्या कामाच्या जोरावर तो अधिकारी जनतेच्या गळ्यातील ताईत बनतो. असाच एक अधिकारी म्हणजे नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे, परजणे यांची प्रशासकीय प्रक्रियेनुसार नातेपुते पोलीस ठाणे येथून सातारा या ठिकाणी बदली झाल्याने नातेपुते पोलीस ठाणे या ठिकाणी त्यांचा निरोप समारंभाचा कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमासाठी नातेपुते नगरपंचायत चे उपनगराध्यक्ष अतुल पाटील, नगरसेवक अविनाश दोशी, शिवप्रसाद उद्योगसमूहाचे अध्यक्ष शरद ( बापू ) मोरे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष बाजीराव काटकर, भाजप शहराध्यक्ष देविदास भैय्या चांगण, पोलीस पाटील विकास रुपनवर, अंकुश करचे, मेजर अनिल माने, मेजर राजेंद्र आढाव तसेच अनेक मान्यवर निरोप समारंभाच्या कार्यक्रमास उपस्थित होते. यावेळी नातेपुते पोलीस ठाण्याच्या वतीने महारुद्र परजणे यांचा स्वप्तनिक सत्कार केला. तसेच गृहरक्षक दलाचे जवान, पत्रकार बांधव, पोलीस पाटील बांधव, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय तसेच क्रीडा क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी महारुद्र पर्जन यांना निरोप समारंभ कार्यक्रमाप्रसंगी सन्मान करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. पत्रकार, पोलीस पाटील, पोलीस कर्मचारी यांच्यासह अनेकांनी महारुद्र परजणे यांच्या कार्याविषयी आपली मनोगते व्यक्त केली.महारुद्र परजणे यांनी पोलीस दलाचा कार्यभार पाहताना सर्वसामान्यांशी संपर्क वाढविण्याबरोबरच नातेपुते व परिसरातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. अनेक दरोडे, घरफोड्या, चोऱ्या उघडकीस आणून आरोपींना जेरबंद केले होते. अनेक नागरिकांचे चोरीस गेलेले दागिने, मोबाईल खात्री करून नागरिकांना परत केले होते.

नातेपुते व परिसरातील शाळा कॉलेज या ठिकाणी रोड रोमींना चांगला चोप देऊन त्यावर आळा बसविला होता सामाजिक सलोखा अबाधित राखण्यासाठी प्रत्येक उत्सव सण यामध्ये स्वतः सहभागी होऊन कायदा सुव्यवस्था कसा आबादित राहील याची त्यांनी चांगली खबरदारी घेतली होती. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना राष्ट्रपती पदक प्राप्त झाले होते. महारुद्र परजणे यांनी त्यांच्या तीन वर्षाच्या कालावधीमध्ये पोलीस प्रशासनात काम करत असताना सर्वांना समजावून घेणे तसेच कर्तव्याशी प्रामाणिकपणे राहून सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याचे काम केल्याने ते नातेपुते व परिसरातील सर्वांचे आवडते पोलीस अधिकारी झाले होते त्यामुळे त्यांच्या या निरोप समारंभाच्या कार्यक्रमासाठी नातेपुते पंचक्रोशीतून अनेक नागरिक हजारोच्या संख्येने पोलीस ठाणे येथे उपस्थित राहिले होते.

हीच त्यांच्या कामाची खरी पोचपावती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नातेपुते पोलीस ठाण्याचे गोपनीय विभागाचे अमोल देशमुख यांनी केले असून कार्यक्रमाचे आभार व सूत्रसंचालन निवेदक संदीप जाधव यांनी मानले.

# राज्यातील विकासकामे ठप्प; निधीअभावी मंत्रालये ‘टक्केवारी व लिलाव पद्धती’ कडे वळल्याचा आरोप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** राज्यातील विकासकामे गेल्या दीड ते दोन वर्षांपासून अक्षरशः ठप्प झाली असून निधीअभावी मंत्रालय प्रशासन व खातेप्रमुख ‘टक्केवारी व लिलाव पद्धती’ ने निर्णय घेत असल्याचा गंभीर आरोप अभियंता व विकासक प्रतिनिधी यांनी केला आहे. राज्याची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असून विविध विभागांकडील विकासकांची कोट्यवधी रुपयांची देणी प्रलंबित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

इंजी. भोसले यांनी सांगितले की, गेल्या दीड–दोन वर्षांत राज्यातील सार्वजनिक बांधकाम, ग्रामीण विकास, जलसंपदा, सामाजिक न्याय, आदिवासी विकास, पर्यटन, जलजीवन मिशन आदी विभागांमार्फत करण्यात आलेल्या विकासकामांची देयके अद्याप अदा करण्यात आलेली नाहीत. परिणामी, अनेक विकासक आर्थिक अडचणीत सापडले असून पुढील कामे हाती घेण्यास कोणीही तयार नाही.

**नवीन कामांना मंजुरीच नाही**

राज्यात गेल्या दीड वर्षांपासून नवीन विकासकामांना मंजुरी देण्याची प्रक्रिया जवळपास बंद असल्याचे त्यांनी नमूद केले. ‘आज परिस्थिती अशी आहे की, काम पूर्ण केल्यानंतर निधी मिळेल की नाही याची कोणतीही खात्री नाही. त्यामुळे जुनी कामेही पुढे सुरू ठेवण्यास विकासक धजावत नाहीत,’ असे त्यांनी सांगितले.

**विविध योजनांना निधीच नाही**

राज्यातील अनेक महत्त्वाच्या योजनांना निधी उपलब्ध नसल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. त्यामध्ये —

- आमदार निधीच्या कामांना गेल्या १४ महिन्यांपासून निधी नाही
- जिल्हा नियोजन समितीच्या कामांना निधी नाही
- लोकप्रतिनिधींच्या विशेष निधीच्या योजनांना निधी नाही
- रस्ते व पूल (बजेट हेड) कामांना निधी नाही
- २५१५ ग्रामीण विकास कामांना निधी नाही
- ३०५४ अंतर्गत खड्डे भरण्याच्या कामांना निधी नाही
- सामाजिक विभागांच्या योजनांना निधी नाही
- शासकीय कार्यालये व निवासस्थानांच्या दुरुस्ती कामांना निधी नाही
- जलजीवन मिशन अंतर्गत कामांना निधी नाही
- आदिवासी विकास व पर्यटन विभागाच्या कामांना निधी नाही

या सर्व बाबींचा थेट परिणाम ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांवर होत असून, मूलभूत सुविधा अपूर्ण राहात असल्याचे त्यांनी सांगितले.

**मंत्रालयात ‘लिलाव व टक्केवारी’ पद्धती?**

राज्याकडे उपलब्ध असलेला अत्यल्प निधी कोणत्या विभागाला मिळावा, यासाठी मंत्रालय व खातेप्रमुखांकडून ‘टक्केवारी व लिलाव पद्धती’ ने निर्णय घेतले जात असल्याचा आरोपही इंजि. भोसले यांनी केला. ‘राज्याकडे निधीची प्रचंड कमतरता आहे. त्यामुळे देणी देण्यासाठी दीर्घ कालावधी लागणार हे स्पष्ट दिसत आहे. यामुळे विकासक आपली देणी कोणत्याही मार्गाने मिळावीत यासाठी धडपड करत आहेत,असे ते म्हणाले.

**शासनाची शांतता धक्कादायक**

या गंभीर परिस्थितीवर अद्याप कोणत्याही मंत्र्यांनी किंवा शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अधिकृत भूमिका मांडलेली नाही, याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. ‘ही स्थिती अत्यंत गंभीर असताना शासनाकडून कोणतेही स्पष्टीकरण दिले जात नाही, ही बाब दुर्दैवी आहे,’ असे मत त्यांनी व्यक्त केले.

**मुख्य सचिवांना आवाहन**

राज्याचे आर्थिक वर्ष मार्च २०२६ मध्ये संपण्यासाठी आता अवघे ४० दिवस शिल्लक राहिले आहेत.

या पार्श्वभूमीवर इंजि. भोसले यांनी थेट मुख्य सचिवांना आवाहन केले आहे. ‘या गंभीर परिस्थितीवर मुख्य सचिवांनी पुढे येऊन स्पष्ट भूमिका मांडावी. विकासकामे ठप्प राहिल्यास राज्याच्या प्रगतीवर त्याचा मोठा परिणाम होईल,’ असे त्यांनी सांगितले.

राज्यातील विकासाचा गाडा रुतल्याने नागरिक, विकासक व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अस्वस्थता वाढत आहे. शासन यावर कोणती ठोस पावले उचलते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# आपदा मित्र सखींनी सिद्धेश्वर तलावात केला बोट चालविण्याचा सराव



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या वतीने सिद्धेश्वर तलाव येथे आपदा मित्र सखींना बोट चालवण्याचा सराव घेण्यात आला. आपत्तीजनक परिस्थितीत बचाव कायार्साठी बोट महत्त्वपूर्ण ठरते. त्यामुळे सातत्यपूर्ण सरावातून गुणवत्तापूर्ण कामगिरी साध्य होऊन बचाव कार्य अधिक प्रभावीपणे करता येईल, असा उद्देश या उपक्रमामागे आहे, अशी माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तिशागर ढोले यांनी दिली. सामाजिक बांधिलकीतून चडचणकर पेट्रोल पंपाचे योगेश चडचणकर यांनी सरावासाठी लागणारे पेट्रोल उपलब्ध करून दिले. त्यामुळे सराव कार्य सुरळीत पार पडले. आपत्तीकाळात मानवहानी टाळण्यासाठी वारंवार सराव शिबिरांचे आयोजन होणे गरजेचे असल्याचे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने स्पष्ट केले. तसेच आपदा मित्र सखी टीमच्या वतीने सरावासाठी लागणारे पेट्रोल सामाजिक बांधिलकीतून दानशूर व्यक्तींनी उपलब्ध करून सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# पुलवामा हल्ल्यात शहीद जवानांच्या स्मरणार्थ श्रद्धांजली कार्यक्रम



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** केंद्रीय सशस्त्र बल भूतपूर्व सैनिक कल्याण संघ, सोलापूर (महाराष्ट्र) यांच्या वतीने १४ फेब्रुवारी २०१९ रोजी पुलवामा येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या सीआरपीएफ जवानांच्या स्मरणार्थ विशेष श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम चार हुतत्मा पुतळा, पार्क चौक जवळ, सोलापूर येथे पार पडला. या प्रसंगी सोलापूर महानगरपालिकेचे महापौर श्री. विनायक कोंड्याल यांनी उपस्थित राहून शहीद जवानांना पुष्पचक्र अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. यावेळी त्यांनी शहीद जवानांच्या अद्वितीय शौर्य, त्याग व राष्ट्रनिष्ठेचा गौरव करत त्यांच्या बलिदानाची आठवण कायम ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे सांगितले. देशाच्या सुरक्षेसाठी प्राणार्पण करणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी संपूर्ण समाज ठामपणे उभा असल्याचा संदेश त्यांनी दिला.

यावेळी केंद्रीय सशस्त्र बल भूतपूर्व सैनिक कल्याण संघाच्या पदाधिकाऱ्यांनी महापौरांकडे संघाच्या कार्यालयासाठी जागा मिळावी तसेच देशासाठी लढणारे जवानांना च्या घराचे मालमत्ता कर माफ करण्यात यावा तसेच शहरामध्ये कार्यालयासाठी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी केली. या मागणीवर सकारात्मक प्रतिसाद देत महापौर श्री. विनायक कोंड्याल यांनी मालमत्ता कर माफीबाबत महापालिका व शासन स्तरावर पाठपुरावा करण्याचे तसेच कार्यालयासाठी योग्य ती जागा उपलब्ध करून देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.कार्यक्रमात भूतपूर्व सैनिक, विविध संघटनांचे पदाधिकारी, मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहीद जवानांच्या स्मृतीप्रित्यर्थ दोन मिनिटे मौन पाळण्यात आले व त्यांच्या आत्म्यास शांती लाभो, अशी प्रार्थना करण्यात आली.यावेळी सिद्धराम चकोते, सगन्ना बिराजदार, मारुती सुरवसे, दत्तात्रय येलपले यांच्या सह आदी मान्यवर उपस्थिती होते.

# राजराजेश्वरी प्राथमिक शाळेचे अबॅकस परीक्षेत सुयश



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** विनायक नगर येथील राजराजेश्वरी बालक मंदिर प्राथमिक शाळेतील ३५ विद्यार्थ्यांनी अबॅकस परीक्षेत उत्तीर्ण झाले. सोलापूरातील श्रद्धा इन्स्टिट्यूट मार्फत घेण्यात आलेल्या नॅशनल लेवलच्या अबॅकसची परीक्षेत शाळेतील संस्कृती उंबरजे,स्वाती लवटे,रुद्र पाटकळे, आदर्श संकण्णा हे चार विद्यार्थी दुसऱ्या श्रेणीत , खुशी फुलारी, श्रेया पुणेकर, आर्या डंगापुरे,हरिष पाटील,आरुष चाबुकस्वार,रोहन चाबुकस्वार, अनविता संकण्णा हे सात विद्यार्थी तिसऱ्या श्रेणीत व उर्वरित सर्व २१ विद्यार्थी चौथ्या श्रेणीत स्थान प्राप्त करुन यश संपादन केले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना स्वाती शहा व सुरेखा डबरे यांचे मार्गदर्शन लाभले. सुरेखा डबरे यांना बेस्ट स्कूल टिचर अवार्ड मिळाला. शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, ज्येष्ठ शिक्षिका वैशाली गुजर, लक्ष्मण कांबळे, हणमंत कुरे, श्रेयस बिराजदार आदींच्या हस्ते सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.यावेळी मुख्याध्यापिका वैशाली कुंभार म्हणाले, विद्यार्थ्यांच्या स्मरणशक्तीला वाव देण्यासाठी, गणित विषयात इक्स्पर्ट होण्यासाठी, तर्क शक्तीत वाढ होण्यासाठी अबॅकस सारख्या परीक्षेची काळाची गरज बनली आहे.पालकांनी अशा स्पर्धात्मक परीक्षेला आपल्या पाल्यांना बसण्यासाठी प्रेरणा देण्याचे आवाहन केले.

# बाबुराव पाटील महाविद्यालयामध्ये क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे उदघाटन



**अनगर (कटूसत्य वृत्त):–** बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय,अनगर येथे दि.१४ ते १९ फेब्रुवारी या कालावधीमध्ये महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सव वर्षानिमित्त क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचा उदघाटन समारंभ नगराध्यक्षा तथा संस्था सचिव सौ.प्राजक्ताताई पाटील यांचे हस्ते करण्यात आला. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रकांत सुर्यवंशी हे होते.या प्रसंगी सौ.प्राजक्ताताई पाटील यांनी विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व विकास करण्यासाठी सर्व स्पर्धेमध्ये सहभाग घेतला पाहिजे असे मार्गदर्शन केले.या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रकांत सुर्यवंशी यांनी रौप्य महोत्सव वर्षानिमित्त महाविद्यालयाच्या प्रगतीविषयक मार्गदर्शन केले.

या प्रसंगी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत ढोले यांनी महाविद्यालयातील उपक्रम त्यातून होणारा व्यक्तिमत्व विकास याविषयी मार्गदर्शन केले.

या प्रसंगी प्रा.डॉ.दादासाहेब पाटोळे व चेतन माळी यांनी मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शारीरिक शिक्षण संचालक प्रा.डॉ.बापू मोहिते यांनी केले.

सूत्रसंचालन प्रा.महादेव चव्हाण यांनी केले व आभार प्रा.डॉ.नितीन गुंड यांनी मानले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे संचालक लहू निरगिडे, नगरसेविका सीमाताई गुंड, रुपाली शिंदे, सुरेखा डिकोळे,जुलेखा मुलाणी व डॉ. कोकणे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# अन्न व औषध प्रशासन विभागातील लाच प्रकरणाची गंभीर दखल

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):–** अन्न व औषध प्रशासन विभागामधील लाच प्रकरणाची गंभीर दखल घेत अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी लाच घेताना पकडलेल्या लिपिकाविरोधात कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. संबंधित लिपिकाची केवळ चौकशीच नव्हे, तर त्यांची प्रतिनियुक्ती रद्द करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

विभागातील दक्षता पथकाला या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. लिपिक राजू ढेरिंगे याच्याविरुद्ध वस्तुनिष्ठ आणि सर्वंकष अहवाल तातडीने सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

राजू ढेरिंगे हे मूळ अन्न व नागरी पुरवठा विभाग येथील कर्मचारी असून सध्या अन्न व औषध प्रशासन विभागात प्रतिनियुक्तीवर कार्यरत होते.

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**
मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय
निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.
–: संपर्क :–
8083608083
9922646566
8698732109

**बोअरवेल**
सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क – शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
9420766666

**वर-वधू**



जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केन्द्र
आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
उमेश माने
मो. 9353370779
रेखा बर्वे
मो. 7218370779

**पाहिजेत**
चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता सिक्युरिटी गार्ड त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ – 11:30 ते 2 वा.

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) आईची बहीण २) अंतराळ कक्षेतील वाहन ३) पाच गुणिले सहा ४) राष्ट्रवादीचे संस्थापक ५) शर्थ, नियम ६) नाकाने ओढतात ती तंबाखूची पूड ९) नगरपालिकेवर निवडून दिलेला लोकप्रतिनिधी १०) बंडखोर स्वभावाचे नेते-नारायण ** १२) दुर्ग, किल्ला १३) शिवकालीन लढाईची पध्दत-गनिमी ** १४) सणादिवशी करतात तो गोड खाद्यपदार्थ १५) भिंतीवरील सरपटणारा प्राणीजीव १७) दह्यापासून बनवितात ते पेय १८) छोटी चारचाकी प्रवासी गाडी २०) एखाद्याला वश करण्याचे उपाय-** ** ** भेद २१) हनुमानाच्या उपासनेचा वार २२) फलंदाजाने बनविलेल्या शंभर धावा २३) वस्तूंची संख्या २५) ध्यास, घेतला ** टाकू नये २६) वरल्या मनाने २८) भारतीय क्रिकेट टीमचे माजी प्रशिक्षक-** शास्त्री ३०) तरचा जोडीदार ३२) हस्त, कर ३३) कागदी चलन ३४) एक म्हण-*** जीव सदाशिव ३५) देवांचा राजा ३६) गती ३७) मुरली, बासरी ३८) तीन दुणे ३९) एक कडधान्य

**आडवे शब्द :** १) युपीच्या माजी महिला मुख्यमंत्री, बसपा सुप्रिमो ४) ऐंशीच्या दशकातील एक अभिनेता -*** सिन्हा ५) मुलाचे एक नाव ७) एक (इंग्रजीत) ८) उन्हाळा (इंग्रजीत) ९) बोल्टचा साथीदार ११) प्रवासाने होणारा त्रास १३) काकाची पत्नी १४) शनिवारवाडा या शहरात आहे १५) उडिदाच्या पिठापासून लाटून बनवितात ते १६) शासकीय कर्मचाऱ्यांचा सुट्टीचा दिवस १७) धातूचा बारीक तंतू १८) गोंधळ, गोंगाट १९) मनाने मजबूत २०) हळू, मंद गतीने २३) मीठ (हिंदीत) २४) चंद्रावर पहिले पाऊल ठेवणारा अंतराळवीर-** आर्मस्ट्राँग २५) उन्हाळ्यात वादळी वाऱ्यासह पडणारा पाऊस २७) बजरंगबलीच्या हातातील आयुध २८) याच्यापासून शिरा बनवितात २९) परीट, धोबी ३१) एक थोर जैन संत ३३) गुलाम, सेवक ३४) श्रीगणेशाचे एक नाव ३६) हॉटेलमधील सेवक ३७) पाकिस्तान संक्षिप्तमध्ये असे लिहितात ३८) सागर, दर्या ४०) एक द्विदल कडधान्य ४१) स्वस्तच्या विरूध्दार्थी

## सुडोकु - 178

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | 5 | | | | 4 | 3 |
| 4 | 7 | | 1 | | 2 | | 5 | |
| | | | | | | 2 | 9 | 1 |
| 9 | | 3 | 4 | | | 5 | 8 | 6 |
| 6 | | | | | 5 | | 2 | |
| | 5 | | | | | 1 | 7 | |
| 3 | | 5 | 8 | | | 9 | 6 | 2 |
| | 2 | 6 | 3 | | 9 | 8 | | 5 |
| 8 | | | | 5 | | | | |

